# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.सआ/एफ/उत्तर/६९१२/अति. निर्मू. दिनांक.३०.०५.२०२४

## जाहीर सूचना

विषय : एफ/उत्तर विभागातील अतिक्रमण निर्मूलन वाहनांवर काम करण्याकरीता हंगामी कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (NGO) मार्फत पुरवठा करण्यासंबंधी जाहीर सूचना.

सदर सुचनेव्दारे नोंदणीकृत अशासकीय संस्थांना (NGO) कळविण्यात येते की, एफ/उत्तर विभागातील अतिक्रमण निर्मूलन वाहनांवर काम करण्याकरीता खालील अटींनुसार हंगामी कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत आपले अर्ज (नोंदणी प्रमाणपत्र व अनुभव इ. कागदपत्रांसह) सहाय्यक आयुक्त 'एफ/उत्तर विभाग यांचे कार्यालय, वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मूलन), ९६, भाऊ दाजी रोड, माटुंगा (पूर्व), मुंबई – ४०० ०१९. येथे दि.०७.०६.२०२४ रोजी दुपारी **३.००** वाजेपर्यंत सीलबंद पेटीत टाकावेत. प्राप्त अर्जांची पडताळणी करुन सोडत त्याच दिवशी दुपारी **४.००** वाजता काढण्यात येईल.

अशासकीय संस्था (NGO) यांनी निम्नलिखित बाबी विचारात घेऊन आपल्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामाकरिता स्थानिक एफ/उत्तर विभागातील अशासकीय संस्थांनी अर्ज करावेत.

२. दि. १५.०६.२०२४ ते दि. १४.११.२०२४ पाच महिन्यांकरिता (एकूण १३० दिवस प्रती महिना २६ दिवस ४ दिवस रविवार सुट्टी व्यतिरिक्त) किंवा प्रस्तावास मान्यता मिळालेल्या दिनांकापासून किंवा जे अगोदर असेल त्या दिनांकापासून ६ कंत्राटी कामगार पुरविणे.

३. प्रती दिन प्रती कामगार रु.७६४.०३ इतके वेतन + ४९.५८% लेव्ही परिपत्रक क्र.प्रकाअ/०१/ २०२४-२०२५ दि.१२.०४.२०२४ अटींच्या पूर्ततेनंतर (प्रतीपूर्ती स्वरूपात) अधिदान देण्यात येईल.

४. एफ/उत्तर अतिक्रमण निर्मूलन विभागातील अधिका-यांच्या सूचनेनुसार फेरीवाला निष्कासन कामाकरिता सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.

५. कामगार पुरवठा केलेल्या बिलाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमानुसार आवश्यक पडताळणी व लेखा परीक्षणानंतर विभागीय सांकेतांक २२०८००४०० या लेखा शिर्षातून संबधित संस्थेला ECS/NEFT व्दारे अधिदान केले जाईल.

६. बालकामगार पुरवठा करणे निषिद्ध आहे.

७. अशासकीय संस्था (NGO) यांनी एफ/उत्तर विभागातील नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील तीन आर्थिक वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

८. वरील अटींचे पालन न करणा-या, समाधानकारक काम न करना-या अशासकीय संस्था (NGO) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर यांचे असतील.

९. अशासकीय संस्था (NGO) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून लॉटरीपद्धतीने पात्र अशासकीय संस्था (NGO) यांची निवड करण्यात येईल.

१०. रु. २०० किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सोबत जोडण्यात यावे.

११. सदर योजनेत अर्ज करणा-या स्थानिक अशासकीय संस्थेने परिपत्रक क्र.सीए/एफआरजी/०३ दि. ११.०५.२०२३ नुसार रु. ३०००/- + १८% वस्तू व सेवा कर असे एकूण रु. ३५४०/- इतक्या रक्कमेचे छाननी शुल्क नागरी सुवीधा केंद्रात भरणा करून पावतीची प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी.

**सही/- ३०.०५.२०२४**

**सहाय्यक आयुक्त 'एफ/उत्तर' विभाग**